स्मरणपत्र

अति महत्वाचे

# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : 022-2261 8987
022-227 08738
Email ID : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.

**No.UDSTAT/ICD/ MIS/2017-18/124 of 2017**

परिपत्रक:—

विषय :— व्यवस्थापकीय माहिती पद्धत (MIS) शैक्षणिक वर्ष २०१७—१८ ऑनलाईन माहिती भरणेबाबत. (www.dhemis.maharashtra.gov.in)

संदर्भ :— क्र. उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१७—१८/११८००, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७.

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांचे संबंधित परिपत्रकाच्या स्मरण पत्रानुसार लक्ष वेधू इच्छितो की, संचालनालयामार्फत शैक्षणिक वर्षे २०१७—१८ या करीता अत्यंत आवश्यक असलेली MIS Online माहिती www.dhemis.maharashtra.gov.in या Web Portal वर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रामध्ये ऑनलाईन स्वरूपात त्वरीत सादर करणे गरजेचे व अनिवार्य आहे.

**संचालनालयाच्या निर्देशनानुसार आपल्या महाविद्यालय/संस्थेमार्फत भरण्यात आलेल्या ऑनलाईन माहितीमध्ये ब—याचशा त्रुटी आढळल्या आहेत, त्या खालील प्रमाणे:—**

१. **माहिती नोंदणी करताना काही महाविद्यालये विशेषत: विनाअनुदानित महाविद्यालये प्रणालीमधील सर्व मॉडयूल्सची माहिती भरत नसल्याचे आढळले. मॉडयूल्समधील विशेषत: शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा—यांची माहिती व्यवस्थितपणे व पुर्ण भरली जात नाही.**

२. **माहिती भरताना नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा जास्त दर्शविण्यात येते. तसेच नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जात नाही, केवळ उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जाते.**

३. **शासकीय/अनुदानित/अंशत: अनुदानित/विना अनुदानित/ग्रामीण/शहरी/आदिवासी/केवळ मुलीं करीता/अल्पसंख्यांकांचे महाविद्यालये (भाषिक/धार्मिक) याबाबतचे वर्गीकरण महाविद्यालयामार्फत व्यवस्थितरित्या प्रणालीमध्ये दर्शविले जात नाही. त्यामुळे वरील बाबींच्या राज्यस्तरावरील एकूण आकडेवारीमध्ये तफावत आढळून येते.**

महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे, यांनी त्यांच्या ईमेलमधील पत्राद्वारे सदरची संबंधित माहिती अत्यंत महत्वाची असल्याकारणाने ती महाराष्ट्र आर्थिक पहाणी शैक्षणिक वर्ष २०१७—१८ या करीता प्रकाशनासाठी अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना संचालनालयामार्फत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने **ती दिनांक १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत त्वरीत सादर करणे आवश्यक आहे.**

सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून Online स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणांस काही समस्या/अडचणी उद्भवल्यास खालील दिलेल्या रकान्यातील ठिकाणानुसार संपर्क साधावा. जेणेकरून संचालनालयास कार्यालयीन कार्यवाही अचूकतेने, विनांविलंब व सोयीस्कररित्या करता येईल. त्याचप्रमाणे तत्संबंधित हमीपत्र/प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ, सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून ना—हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) घ्यावे.

| Contact Person | Office | Land Line No. | E-mail ID |
|---|---|---|---|
| MIS Call Centre, Pune | Director of Higher Education, Government of Maharashtra, Pune. | 020 - 6500 1173<br>020 - 6500 1016 | stat.dhepune@nic.in |
| Nodal Officer (AISHE/MIS Cell) | University of Mumbai, Statistical Unit, Room No. 202, Fort, Mumbai- 400 032. | 022 - 2270 8738<br>022 - 2261 8987 | supt.statunit@gmail.com |



Scanned by CamScanner

# मुंबई विद्यापीठ



**टिप्पणी :— १) MIS बाबतची माहिती फक्त कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांनी भरणे व तसेच सदरची ऑनलाईन माहिती दिनांक १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत भरणे अनिवार्य आहे. (वास्तूशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन व औषधशास्त्र अभ्यासक्रम वगळता).**

**२) संबंधित ऑनलाईन माहिती ज्या महाविद्यालय/संस्था यांनी भरलेली असल्यास सदरचे परिपत्रक (स्मरण पत्र) दुर्लक्षित करावे.**

मुंबई— ४०० ०३२
दिनांक : ०७ डिसेंबर, २०१७

नोडल अधिकारी
**(AISHE/MIS)**

---

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवाना:—

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत, पुणे—४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदवुत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.

**यांना असे कळविण्यात येते की, MIS बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्नीत महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालये/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज (Exam.Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form) महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension) /प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुबंई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.**

नोडल अधिकारी
**(AISHE/MIS)**

Scanned by CamScanner